सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# विधि व न्याय विभाग

# सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८

## मुंबईचा काकवीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९५६

## (दिनांक ३० एप्रिल, २००५ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. XXXVIII of 1956

# THE BOMBAY MOLASSES (CONTROL) ACT, 1956

*( As modified upto the 30th April 2005 )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६.

[किंमत रुपये ६-०० ]

# मुंबईचा काकवीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९५६

---

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. काकवी मंडळ, त्याची रचना आणि कार्यरीती.
४. काकवी मंडळाची कामे.
५. इन्स्पेक्टर आणि त्यांचे अधिकार व कामे.
६. काकवीचा पुरवठा, वाटप वगैरेवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.
७. अपराध, शिक्षा आणि जप्ती.
८. कंपन्यांनी केलेले अपराध.
९. अपराधांची दखल घेणे.
१०. अपराध आपसात मिटविणे.
११. अपराधांचा तपास करण्याचा अधिकार दिलेले अधिकारी.
१२. प्रवेश करणे, झडती घेणे, जप्त करणे आणि अटक करणे यासंबंधीचे अधिकार.
१३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे ठराव तपास वगैरेस लागू असणे.
१४. काकवी जप्त केल्याचा रिपोर्ट मॅजिस्ट्रेटकडे करणे.
१५. अधिकार सोपविणे.
१६. माफी.
१७. कामकाजाचे दप्तर मागविण्याचा आणि तपासण्याचा राज्य सरकारचा अधिकार.
१८. अधिनियमान्वये काम करणारे अधिकारी व इसम सरकारी नोकर असणे.
१९. कामकाजास मनाई.
२०. नियम करण्याचा अधिकार.

# [ सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ ][1]

[ मुंबईचा काकवीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९५६ ] †

या अधिनियमास दिनांक २१ जून, १९५६ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली.

[ राष्ट्रपती यांची मंजुरी मिळाल्यानंतर ''महाराष्ट्र शासन राजपत्र भाग ४ मध्ये''

दिनांक २८ जून, १९५९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (१४-१-१९८१) @

**विवक्षित उद्योगधंद्यांच्या विकासाच्या कारणाकरिता काकवीचे न्याय्य वाटप होण्याची आणि ती वाजवी भावाने मिळण्याची खात्रीलायक तरतूद करून तिच्या पुरवठ्याचे नियमन करण्याची व त्यावर नियंत्रण ठेवण्याची व इतर विवक्षित बाबींची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी**, विवक्षित उद्योगधंद्यांच्या विकासाच्या कारणाकरिता काकवीचे न्याय्य वाटप होण्याची आणि ती वाजवी भावानें मिळण्याची खात्रीलायक तरतूद करून तिच्या पुरवठ्याचें नियमन करण्याची व त्यावर नियंत्रण ठेवण्याची व यात यापुढे दिलेल्या इतर विवक्षित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी यावरून पुढे लिहिल्याप्रमाणे कायदा करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, सन १९५६ चा मुंबईचा काकवीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[2][ (२) तो, सबंध [3][ महाराष्ट्र राज्यास ] लागू असेल. ]

(३) तो, राज्य सरकार राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून याबाबत नेमील त्या तारखेस [4] अंमलात येईल.

२. या अधिनियमात, विषयास अगर संदर्भास काही बाध येत नसेल तर— व्याख्या.

(क) ''कलेक्टर'' या संज्ञेचा अर्थ, जमीनमहसुलाचा कलेक्टर, असा समजावा ;

सन १९४९ चा मुंबई २५. [5] [ (ख) ''आयुक्त'' म्हणजे मुंबई मद्यनिषेध अधिनियम, १९४९ अन्वये नेमलेला दारुबंदी व उत्पादन शुल्क आयुक्त ] ;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवदेनासाठी मुंबई शासन राजपत्र, असाधारण, १९५६, भाग ५ पृ. ८४ पहा.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ३(१) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (२) दाखल केले.

[3] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये ''मुंबई राज्यास'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[4] हा अधिनियम, १ एप्रिल, १९६० रोजी अंमलात येईल. पहा. शासकीय अधिसूचना-१ आणि सी. डी क्र. १ डीएल ४१६०-भारत-१ दि. ३१ मार्च १९६०.

[5] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५,कलम २ अन्वये खंड (ख) दाखल करण्यात आला.

† सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास तो लागू करण्यात आला (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम २ पहा)

@ ही खूण अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शविते. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याचे कलम ९ पुढीलप्रमाणे आहे.

९. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिवशी किंवा त्यानंतर त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामधील आणि त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही नियमामधील किंवा आदेशामधील किंवा कोणत्याही विलेखामधील किंवा दस्तऐवजामधील साखर संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यासंबंधीचा निर्देश म्हणजे या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या आणि आदेशांच्या प्रयोजनार्थ या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमांच्या कलम २ च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेला दारुबंदी व उत्पादन शुल्क आयुक्त यासंबंधीचा निर्देश म्हणून समजण्यात येईल. अधिनियमिती किंवा विलेख यामधील साखर संचालकांच्या निर्देशाचा अन्वयार्थ.

(ग) "इन्स्पेक्टर" या संज्ञेचा अर्थ, कलम ५ अन्वये नेमलेला इन्स्पेक्टर, असा समजावा ;

(घ) "काकवी" या संज्ञेचा अर्थ, ऊस किंवा गूळ यापासून निर्वात किंवा खुल्या पात्रद्वारा साखर तयार करण्याच्या अखेरच्या पर्यायात उत्पादन केलेला जड, काळ्या रंगाचा स्निग्ध द्रवपदार्थ–जेव्हां अशा द्रवपदार्थात किंवा त्याच्या कोणत्याही स्वरुपांत किंवा मिश्रणांत साखर असेल तेव्हा–असा समजावा ;

(ङ) "साखरेच्या कारखान्याचा भोगवटा करणारा" या संज्ञेचा अर्थ, ज्या इसमाचे एखाद्या साखरेच्या कारखान्याच्या कामकाज़ावर अंतिम नियंत्रण असेल तो इसम, असा समजावा ;

(च) "ठरविलेले" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमा अन्वयेचे नियम व हुकूम यांवरुन ठरविलेले, असा समजावा ;

(छ) "साखरेचा कारखाना" या संज्ञेचा अर्थ, ज्या जागेत, तिची हद्द धरुन, वीस किंवा अधिक कामगार काम करीत असतील किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी काम करीत असतील आणि ज्या जागेच्या कोणत्याही भागांत, निर्वात-पात्राच्या सहाय्यानें किंवा खुल्या पात्रांत साखरेचे उत्पादन करण्याशी संबंध असलेली माल तयार करण्याची क्रिया करण्यांत येते किंवा ती सामान्यपणें शक्तींच्या सहाय्यानें करण्यांत येते अशी कोणतीही जागा, असा समजावा.

काकवी मंडळ, त्याची रचना आणि कार्यरीति.

३. (१) राज्य सरकारास काकवीसंबंधींच्या बाबींवर सल्ला देण्याचा कारणाकरिता, काकवी मंडळाची रचना करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये रचना केलेल्या काकवी मंडळांत, ठरविण्यात येतील अशा पात्रता असलेले सहाहून कमी नाहीत इतके सदस्य असतील. अशा रीतीनें नेमलेला किंवा नेमलेले एक किंवा अनेक सदस्य राज्य सरकारची मर्जी असेल तोपर्यंत हुद्दा धारण करतील.

(३) मंडळाचे कामकाज निकालात काढण्याच्या कारणासाठी तीन सदस्यांची गणपूर्ती होईल.

(४) मंडळाच्या सदस्यांची कोणतीही रिकामी जागा शक्य तितक्या लवकर भरली पाहिजे ;

मात्र असे ठरविण्यांत येते की, अशी कोणतीही जागा रिकामी झाल्याच्या मुदतीत, चालू सदस्यांनी, जणूं कोणतीही जागा रिकामी झाली नसल्याप्रमाणे काम केले पाहिजे.

(५) मंडळाच्या कामासंबंधीची कार्यरिती ठरविण्यांत येईल अशी असेल.

काकवी मंडळाचीं कामें.

४. काकवी मंडळानें—

(क) काकवीची श्रेणी ठरविणें आणि तिची खरेदी-विक्री, ज्या दरांने काकवीची विक्री केली पाहिजे ते दर आणि सामान्यपणें दारुच्या भट्ट्यांसाठी आणि इतर कारणांसाठी तिची वाटणी यासंबंधीच्या बाबींवर राज्य सरकारला सल्ला दिला पाहिजे, आणि

(ख) ठरविण्यांत येतील अशी इतर कामें केली पाहिजेत.

इन्स्पेक्टर आणि त्यांचे अधिकार व कामे.

५. (१) राज्य सरकारास, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, ठरविलेल्या पात्रता असलेल्या त्यास योग्य वाटतील अशा इसमांना, ह्या अधिनियमांच्या कारणांकरिता, राज्य सरकार त्यांस अनुक्रमे नेमून देईल अशा स्थानिक हद्दीत इन्स्पेक्टर म्हणून नेमण्याचा अधिकार आहे :

मात्र असे ठरविण्यांत येते की, काकवीची वाहतूक, विक्री, पुरवठा किंवा वाटप यात आर्थिक हितसंबंध असलेल्या कोणत्याही इसमास ह्या पोट-कलमा अन्वयें इन्स्पेक्टर म्हणून नेमता कामा नये.

(२) अशा प्रत्येक इन्स्पेक्टरास, राज्य सरकार व [1][ आयुक्त ] यांच्या नियंत्रणास पात्र राहून, सर्व वाजवी वेळीं, कोणत्याही इसमाजवळ किंवा साखर कारखान्यांत असलेले काकवीचे सांठे तपासण्याचा, पृथक्करणासाठीं किंवा परीक्षा करण्यासाठी अशा काकवीचे नमुने घेण्याचा किंवा काकवींतील व्यवहाराच्या संबंधात कोणत्याही इसमाच्या किंवा साखरेच्या कारखान्याच्या कबज्यांत किंवा रखवालींत असलेलीं लैसेन्सें, परवाने, दफ्तर, पुस्तके, हिशोब, पत्रकें, दस्तऐवज किंवा निवेदने तपासण्याचा अधिकार आहे.

(३) अशा प्रत्येक इन्स्पेक्टरानें, ह्या अधिनियमावरून किंवा त्याअन्वयें त्यास देण्यांत येतील असे इतर अधिकार चालविले पाहिजेत व त्याच्यावर लादण्यांत येतील अशी कामे पार पाडली पाहिजेत.

काकवीचा पुरवठा, वाटप वगैरेवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.

६. (१) जर कोणत्याही उद्योगधंद्याचा विकास करण्याच्या कारणाकरिता काकवीचे न्याय्य वाटप होण्याची आणि ती वाजवी भावाने मिळण्याची खात्रीलायक तरतूद करून तिचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे राज्य सरकारचे मत असेल तर, त्यास (राज्य सरकारास), हुकूम करून, काकवीचा पुरवठा आणि वाटप किंवा तिचा व्यापार व वाणिज्य यांचे नियमन करण्याची तरतूद करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) वरून मिळालेल्या अधिकाराच्या सामान्यतेस बाध न येता, त्याअन्वयें केलेल्या हुकुमात पुढील गोष्टींबाबत तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(क) सामान्यतः किंवा कोणत्याही उद्योगधंद्याच्या कारणाकरिता काकवीची खरेदी किंवा विक्री ज्या भावाने किंवा ज्या रीतीने करता येईल तो भाव व ती रीत यावर नियंत्रण ठेवण्याबाबत ;

(ख) काकवीचा साठा, पुरवठा, वाहतूक किंवा वाटप करणे, तिची विल्हेवाट लावणे, ती संपादन करणे, जवळ बाळगणे, तिचा वापर करणे किंवा खप यांची लैसेन्सें किंवा परवाने देऊन किंवा इतर रीतीने नियमन करण्याबाबत ;

(ग) कोणताही इसम किंवा साखरेच्या कारखान्याचा भोगवटा करणारा यास त्याने साठा केलेली किंवा त्याच्या कारखान्यांत उत्पादन केलेली किंवा करावयाची काकवी, इतरांस सर्वस्वी किंवा अंशतः वगळून राज्य सरकारास किंवा हुकुमांत निर्दिष्ट करण्यात येईल अशा इसमास किंवा इसमांच्या वर्गास आणि अशा परिस्थितीत आणि अशा अटीवर विकण्यास फर्माविण्याबाबत ;

(घ) काकवीचे नमुने घेणे आणि तिची श्रेणी ठरविणे व परीक्षा करणे याबाबत ;

(ङ) काकवीसंबंधींच्या ज्या व्यापारविषयक किंवा आर्थिक व्यवहारामुळे राज्य सरकारच्या मते किंवा त्यांचे नियमन केले नाहीत तर सार्वजनिक हितास बाध येण्याचा संभव आहे अशा व्यापारविषयक किंवा आर्थिक व्यवहाराच्या कोणत्याही वर्गाचे नियमन करण्याबाबत किंवा त्यास प्रतिबंध करण्याबाबत ;

(च) वरील गोष्टींपैकी कोणत्याही गोष्टीचे नियमन करणे किंवा त्यास प्रतिबंध करणे याकरिता कोणतीही माहिती किंवा आकडे गोळा करण्याबाबत ;

[1]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वयें "डायरेक्टर" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(छ) साखरेच्या कारखान्याचा भोगवटा करणारे आणि काकवीचे उत्पादन, पुरवठा, वाटप करीत असलेले किंवा काकवीचा व्यापार व वाणिज्य करीत असलेले इसम यांना, हुकुमात निर्दिष्ट करण्यात येतील अशी त्यांच्या धंद्यासंबंधीची पुस्तके, हिशोब आणि दफ्तर ठेवण्यास आणि तपासणीसाठी हजर करण्यास आणि हुकुमात निर्दिष्ट करण्यात येईल अशी त्यांच्या धंद्यासंबंधीची माहिती पुरविण्यास फर्माविण्याबाबत ; आणि

(ज) विशेषतः लैसेन्सें, परवाने किंवा इतर दस्तऐवज देणे किंवा काढणे, त्यांच्या अटी व शर्ती आणि त्यासाठी फी आकारणे ह्या गोष्टी धरून, कोणत्याही आनुषंगिक किंवा पुरवणीवजा गोष्टींबाबत.

(३) पोट-कलम (२), रकम (क) हीस अनुलक्षुन केलेल्या कोणत्याही हुकुमानुसार जो कोणताही इसम काकवीची विक्री करील तेव्हा त्यास त्याची किंमत पुढीलप्रमाणें दिली पाहिजे :--

(क) नियंत्रित किंमत, कोणतीही असल्यास, तीस सुसंगत अशा रीतीने, कबुलायत करून किंमत ठरविता येईल तर, अशा रीतीने कबुलायतीने ठरविलेली किंमत ;

(ख) जेव्हा अशी कबुलायत होणे शक्य नसेल तेव्हा, ह्या कलमाअन्वये निश्चित केलेल्या नियंत्रित किंमतीस, कोणतीही असल्यास, अनुलक्षून ठरविलेली किंमत ; आणि

(ग) जेव्हा रकम (क) किंवा रकम (ख) ह्यापैकी कोणतीही रकम लागू नसेल तेव्हा, विक्रीच्या तारखेस त्या विभागात प्रचलित असलेल्या बाजारभावावरून ठरविलेली किंमत.

(४) ह्या कलमाअन्वये केलेला हुकूम,--

(क) सामान्य स्वरूपाचा किंवा इसमांच्या वर्गासंबंधाने असेल अशा हुकूमाच्या बाबतीत, राजपत्रांत प्रसिद्ध केला पाहिजे ;

(ख) एखादी व्यक्ति, कॉर्पोरेशन किंवा पेढी यांच्या संबंधीच्या हुकूमाच्या बाबतीत, सन १९०८ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या पहिल्या परिशिष्टांतील, प्रसंगाप्रमाणे ऑर्डर २९, नियम २ किंवा ऑर्डर ३०, नियम ३ यात समन्स बजावण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने बजावला पाहिजे ; आणि

(ग) विशिष्ट व्यक्तीस केलेला असेल त्या बाबतीत तो अशा व्यक्तीवर--

(१) सदरहू हुकूम जातीने त्याच्या स्वाधीन करून किंवा देऊन, किंवा

(२) पोस्टाने पाठवून, किंवा

(३) सदरहू व्यक्ति आढळून येत नसेल तेव्हा, सदरहू हुकूमाची अस्सल प्रत त्याच्या कुटुंबातील प्रौढ पुरुषाकडे देऊन किंवा ती ज्या ठिकाणी शेवटी राहिली असेल किंवा तिने धंदा चालविला किंवा फायद्यासाठी काम केले असेल त्या जागेच्या एखाद्या ठळक भागावर अशी प्रत लावून बजावला पाहिजे.

(५) ह्या कलमास अनुसरून केलेल्या हुकुमाची एखाद्या इसमास वाजवी रीतीने माहिती देण्यात आली होती किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, पोट-कलम (४) मधील आवश्यक गोष्टीनुसार वागणे हे, त्यास अशा रीतीने माहिती दिल्याचा निर्णायक पुरावा असेल ; परंतु, सदरहू आवश्यक गोष्टीनुसार

वागण्यात कसूर केल्याने, त्या इसमास अशी माहिती देण्यात आली होती ही गोष्ट इतर उपायांनी सिद्ध करण्यास प्रतिबंध होणार नाही किंवा हुकुमाच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

(६) ह्या कलमाअन्वये केलेला कोणताही हुकूम हा ह्या अधिनियमाखेरीज इतर कोणताही कायदा किंवा ह्या अधिनियमाखेरीज इतर कोणत्याही कायद्यामुळे अंमलात असलेला कोणताही लेख यात त्याशी विसंगत असा कोणताही मजकूर असला तरीही, अंमलात असेल.

(७) ह्या कलमावरून मिळालेला कोणताही अधिकार चालवितांना एखाद्या प्राधिकाऱ्याने सही करून कोणताही हुकूम करण्याचे योजिले असेल तेव्हा, कोर्टाने सन १८७२ चा भारताचा पुराव्याविषयी अधिनियम याच्या अर्थानुसार, असा हुकूम त्या प्राधिकाऱ्याने अशा रीतीने केला होता असे गृहीत धरले पाहिजे.

अपराध शिक्षा आणि जप्ती.

७. (१) जो कोणी ह्या अधिनियमाच्या कोणत्याही ठरावांचा किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही हुकुमाचा किंवा ह्या अधिनियमाअन्वये केलेल्या कोणत्याही हुकुमाअन्वये दिलेल्या कोणत्याही लैसेन्साच्या किंवा परवान्याच्या कोणत्याही अटीचा किंवा शर्तीचा भंग करील त्यास, त्याजवर अपराधशाबितीचा ठराव झाल्यावर, पराकाष्टा एक वर्ष मुदतीच्या कैदेची किंवा दंडाची यापैकी कोणत्याही प्रकारची शिक्षा होईल.

(२) अशा भंगाचा इन्साफ करणाऱ्या कोणत्याही कोर्टास, काकवीच्या ज्या कोणत्याही साठ्याच्या संबंधात सदरहू भंग झाला आहे अशी कोर्टाची खात्री झाली असेल तो साठा, काकवीचा असा साठा ज्यात असेल असा कोणताही खोका, पात्र, पॅकेज किंवा वेष्टण यांसह राज्य सरकारकडे जमा व्हावा असा हुकूम करण्याचा अधिकार आहे.

कंपन्यांनी केलेले अपराध.

८. (१) ह्या अधिनियमाअन्वयेचा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, अपराध केल्याच्या वेळी, कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनी ज्या इसमाच्या स्वाधीन होती आणि जो इसम तिला जबाबदार होता तो प्रत्येक इसम व त्याचप्रमाणे कंपनी ही अपराध केल्याबद्दल दोषी आहेत असे समजले पाहिजे आणि ती त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध खटला केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र असतील.

मात्र असे ठरविण्यात येते की, जर असा कोणताही इसम, असा अपराध त्याच्या नकळत झाला आहे किंवा असा अपराध होऊ नये म्हणून त्याने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे शाबीत करील तर तो, ह्या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरावरून कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये कोणताही मजकूर असला तरीही, जेव्हा एखाद्या कंपनीकडून ह्या अधिनियमाअन्वये अपराध घडला असेल आणि तो अपराध कंपनीच्या कोणत्याही डायरेक्टरच्या, मॅनेजरच्या, सेक्रेटरीच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याच्या कोणत्याही हयगयीमुळे घडला आहे असे शाबीत करण्यात येईल तेव्हा, असा डायरेक्टर, मॅनेजर, सेक्रेटरी किंवा इतर अधिकारी हा सुद्धा, त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यात आले पाहिजे आणि तो त्याप्रमाणे त्याच्याविरुद्ध खटला केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र असेल.

**खुलासा.**—ह्या कलमाच्या कारणांसाठी,—

(क) " कंपनी " ह्या संज्ञेचा अर्थ, कोणतीही संस्थापित मंडळी, असा समजावा आणि तीत एखाद्या पेढीचा किंवा इसमांच्या इतर संस्थेचा समावेश होतो.

(ख) एखाद्या पेढीच्या संबंधात " डायरेक्टर " या संज्ञेचा अर्थ, सदरहू पेढीचा भागीदार, असा समजावा.

अपराधांची दखल घेणे.

९. (क) कोणत्याही कोर्टाने, ह्या अधिनियमान्वये शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाची, [1][आयुक्त] आगाऊ मंजुरीने असेल ते खेरीजकरून, दखल घेता कामा नये.

(ख) [2][महानगर दंडाधिकारी] किंवा पहिला वर्गाचा मॅजिस्ट्रेट याच्या दर्जाहून कमी दर्जा असलेल्या कोणत्याही कोर्टाने ह्या अधिनियमाअन्वये शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाचा इन्साफ करता कामा नये.

(ग) [3][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] यात कोणताही मजकूर असला तरीही, ह्या अधिनियमाअन्वये शिक्षा होण्याजोगा अपराध दखल घेण्याजोगा आणि जामीन घेण्याजोगा असेल.

अपराध आपसात मिटविणे.

"१०. (१) राज्य शासनास, या अधिनियमाखाली शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल कोणतीही कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, अशा अपराधाचा जिच्यावर आरोप करण्यात आला असेल अशा व्यक्तीकडून, अपराधाच्या तडजोडीदाखल शासन ठरवील अशी रक्कम स्वीकारण्यास मंजुरी देता येईल आणि या अधिनियमाखाली जप्तीस पात्र अशी जप्त करण्यात आलेली कोणतीही मालमत्ता, तिचे शासनाने किंवा शासन या बाबतीत प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याने अंदाजिलेले मूल्य दिल्यानंतर, मुक्त करण्याचा निदेश देता येईल.

(२) अशा व्यक्तीने यथास्थिती अशी रक्कम किंवा असे मूल्य किंवा दोन्ही दिल्यानंतर, अशी व्यक्ती जर ताब्यात (कस्टडीत) असेल तर तिला स्वतंत्र करण्यात येईल आणि जप्त केलेली मालमत्ता मुक्त करण्यात येईल. जर अशा व्यक्तीविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयामध्ये कोणतीही कार्यवाही दाखल करण्यात आलेली असेल तर, अपराधाची तडजोड म्हणजेच त्या व्यक्तीची निर्दोष मुक्तता मानण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत, अशा व्यक्तीविरुद्ध त्याच वस्तुस्थितीच्या संदर्भात, कोणतीही आणखी कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. "

अपराधाचा तपास करण्याचा अधिकार दिलेले अधिकारी.

११. इन्स्पेक्टर आणि पोलीस ठाणे स्वाधीन असणाऱ्या अधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला पोलीस अधिकारी यांना, असा अधिकारी ज्या प्रदेशात हुकूमत चालवित असेल त्या प्रदेशाच्या हद्दीत, ह्या अधिनियमाअन्वये शिक्षा होण्योजोग्या कोणत्याही अपराधाचा तपास करण्याचा अधिकार असेल.

प्रवेश करणे, झडती घेणे, जप्त करणे आणि अटक करणे यासंबंधीचे अधिकार.

१२. (१) [4][आयुक्त] कलेक्टर किंवा ह्या अधिनियमाअन्वयेच्या अपराधाचा तपास करण्यासाठी कलम ११ अन्वये अधिकार दिलेला कोणताही अधिकारी यास--

(क) ज्या कोणत्याही काकवीच्या संबंधात ह्या अधिनियमाअन्वये शिक्षा होण्याजोगा अपराध घडला आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे ती काकवी ज्या जागेत ठेवण्यात किंवा लपवून ठेवण्यात आली आहे असे त्यास सकारण वाटेल अशा कोणत्याही जागेत सर्व वाजवी वेळी प्रवेश करण्याचा आणि तिची झडती घेण्याचा आणि अशी काकवी व अशी काकवी ज्यात असेल असा कोणताही खोका, पात्र, पॅकेज वेष्टण जप्त करण्याचा ;

(ख) कोणत्याही खुल्या जागेत किंवा ने-आण करताना ज्या काकवीच्या संबंधात ह्या अधिनियमाअन्वये शिक्षा होण्याजोगा अपराध घडला आहे असे त्यास सकारण वाटेल अशी काकवी आणि तसेच अशी काकवी ज्यात असेल असा कोणताही खोका, पात्र, पॅकेज किंवा वेष्टण जप्त करण्याचा ;

---

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४ (१) अन्वयें मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ६(१) अन्वयें "डायरेक्टर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) अशा रीतीने जप्त केलेल्या काकवीच्या व्यवहारासंबंधीची कोणतीही पुस्तके, हिशोब, दस्तऐवज किंवा पत्रके जप्त करण्याचा ;

(घ) जो इसम ह्या अधिनियमान्वये शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी आहे असे त्यास सकारण वाटेल अशा कोणत्याही इसमास अटकावून ठेवण्याचा, त्याची झडती घेण्याचा आणि पकडण्याचा ;

अधिकार आहे.

(२) [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] याचे ठराव, शक्य असेल तेथवर, ते सदरहू कायद्याच्या [२][९४] व्या कलमाअन्वये घेतलेली कोणतीही झडती किंवा केलेली कोणतीही जप्ती यास ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे ह्या कलमान्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीस किंवा केलेल्या कोणत्याही जप्तीस लागू असतील.

**१३.** ह्या अधिनियमात इतर रीतीने स्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीजकरून, तपास, झडत्या, जप्त्या, अटक आणि रखवालीत अटकावून ठेवणे या सर्व गोष्टी [३][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] यास अनुसरून केल्या पाहिजेत. **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे ठराव तपास वगैरेस लागू असणे.**

**१४.** (१) कलम १२ अन्वये जप्त केलेल्या कोणत्याही काकवीचा किंवा वस्तुचा रिपोर्ट, शक्य तितक्या लवकर, हुकूमत असणाऱ्या मॅजिस्ट्रेटकडे सादर केला पाहिजे आणि सदरहू मॅजिस्ट्रेटास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तिच्या तात्पुरत्या रखवालीबद्दल त्यास योग्य वाटेल असा आदेश देण्याचा अधिकार आहे. **काकवी जप्त केल्याचा रिपोर्ट मॅजिस्ट्रेटकडे करणे.**

(२) जेव्हा कोणताही खटला दाखल करण्यात आला नसेल किंवा कलम १० अन्वये सदरहू अपराधाची तोडजोड करण्यात आली असेल तेव्हा, मॅजिस्ट्रेटास, कलम १० च्या ठरावासच पात्र राहून, अशी काकवी किंवा अशा वस्तू ज्या इसमांकडून जप्त करण्यात आल्या असतील त्या इसमास परत करण्यास फर्माविण्याचा अधिकार आहे.

**१५.** प्रसंगाप्रमाणे, राज्य सरकारास किंवा [४][आयुक्त] राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, त्यास मिळालेला कोणताही अधिकार किंवा त्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य, राज्य सरकार किंवा डायरेक्टर निर्दिष्ट करील अशा शर्तीस पात्र राहून, त्याने निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांनेसुद्धा बजाविण्यात यावे असे फर्माविण्याचा अधिकार आहे. **अधिकार सोपविणे.**

**१६.** राज्य सरकारास, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस पात्र राहून, ह्या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा हुकुमांच्या सर्व किंवा कोणत्याही ठरावांची कोणताही प्रदेश किंवा कोणताही इसम किंवा इसमांचा कोणताही वर्ग यांना सर्वस्वी किंवा अंशतः माफी देण्याचा अधिकार आहे. **माफी.**

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम ६(२) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(२) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ८ अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

कामकाजाचे दफ्तर मागविण्याचा आणि तपासण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**१७.** राज्य सरकारास, ह्या अधिनियमाअन्वये केलेल्या हुकुमाअन्वये लैसेन्स किंवा परवाना देण्यासंबंधीचे किंवा नाकारण्यासंबंधीचे दफ्तर धरून, ह्या अधिनियमाअन्वये अधिकार बजावणाऱ्या आणि कर्तव्ये पार पाडणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यापुढील कोणत्याही कामकाजाचे दफ्तर, अशा कामकाजात केलेल्या कोणत्याही हुकुमाचा बिनचूकपणा, कायदेशीरपणा किंवा युक्तता यासंबंधी किंवा अशा कामकाजाच्या नियमितपणासंबंधी स्वतःची खात्री करण्याच्या कारणाकरिता; मागविण्याचा आणि तपासण्याचा अधिकार आहे ; आणि त्यास (राज्य सरकारास) असा हुकुम रद्द करण्याचा, फिरविण्याचा, त्यास सुधारणा करण्याचा किंवा तो कायम करण्याचा किंवा त्यास योग्य वाटेल असा इतर हुकूम करण्याचा अधिकार आहे.

अधिनियमाअन्वये काम करणारे अधिकारी व इसम सरकारी नोकर असणे.

**१८.** ह्या अधिनियमाअन्वये कोणतेही अधिकार बजाविण्याचा किंवा कोणतीही कामे पार पाडण्याचा अधिकार दिलेले सर्व अधिकारी, इन्स्पेक्टर आणि इसम हे, भारताचा अपराध्यास शिक्षा करण्याविषयी कायदा याच्या २१ व्या कलमाच्या अर्थानुसार सरकारी नोकर आहेत असे समजण्यात आले पाहिजे.

कामकाजास मनाई.

**१९.** ह्या अधिनियमाअन्वये शुद्धबुद्धीने केलेल्या किंवा करावयाचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल राज्य सरकारविरुद्ध किंवा ह्या अधिनियमाअन्वये अधिकार बजावण्याचा किंवा कामे पार पाडण्याचा अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कोणत्याही इसमाविरुद्ध कोणताही दावा किंवा कामकाज दाखल करता कामा नये.

नियम करण्याचा अधिकार.

**२०.** (१) राज्य सरकारास, आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस पात्र राहून, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता, नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषतः व सदरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध न येता, अशा नियमांत,—

(क) काकवीच्या शुध्दतेसंबंधी तपशील व परीक्षा ठरविण्याचा ;

(ख) काकवी मंडळाची इतर कामे आणि त्याचे कामकाज चालविणे व त्याची कामे पार पाडणे यासंबंधीची कार्यरीती ठरविण्याचा, अधिकार आहे.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.